Vivekanand Shikshan Sanstha’s

**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**

Samarthnagar, Aurangabad.

Date :

# PRESS RELEASE

## विवेकानंदमध्ये "अभिप्रेरणा व व्यक्तिमत्व विकास" यावर व्याख्यान

येथील विवेकानंद महाविद्यालयामध्ये "अभिप्रेरणा व व्यक्तिमत्व विकास" या विषयावर डॉ. विभाश्री कौशल दीदी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर श्याम शिरसाठ तर प्रमुख उपस्थितीत संगणक विभागाचे प्रमुख डाॅ. अशोक गायकवाड, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डाॅ. राजेंद्र शेजुळ व कनिष्ट महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती शुभांगी गोडबोले उपस्थित होत्या.

आपल्या भाषणात विभाश्री दीदी म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कमजोरी स्वतः ओळखले पाहिजे व जे विद्यार्थी जास्त बोलतात ते वेळेवर बोलू शकत नाहीत. विद्यार्थ्यांनी विवेकानंदाचा वारसा जपला पाहिजे व जेंव्हा गरज असेल तेंव्हाच बोलले पाहिजे. तसेच आपल्या भाषणात विभाश्री दीदी पुढे म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी जेव्हा गरज पडेल तेंव्हाच कमी बोलले पाहिजे, हळू बोलले पाहिजे व जास्तीत जास्त ,मौन ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांनी ह्या तीन गोष्टी आपल्या जीवनात अंगीकारल्या तर नक्कीच यशस्वी होतील याबद्दल दुमत नाही. तसेच त्यांनी मनाबरोबर पायी चालण्याने मेंदूला ऑक्सिजन मिळतो असेपण सांगितले. तसेच काम करताना स्वतःला त्रास झाला तरी चालेल पण दुसऱ्याला त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी असे त्यांनी ह्यावेळेस मत व्यक्त केले. समस्याला पाठ दाखवून न जाता त्यांचा सामना करावा असा मौलिक सल्ला त्यांनी यावेळेस विद्यार्थ्यांना दिला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. श्याम कुलकर्णी, सूत्रसंचालन डॉ शर्मिष्ठा ठाकूर, तर आभारप्रदर्शन प्रा. योगेश कातबने यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.




DR VIBHASHRI KAUSHAL
SMT. SHUBHANGI GODBOLE